



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३७ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# महाराष्ट्रात ईडीकडून मोठी कारवाई, देशभरात ५० शाखा असणाऱ्या सोसायटीची ३३३ कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरु आहे. त्यावेळी अमंलबजावणी संचालनालयाने मोठी कारवाई केली आहे. बीड येथील मुख्यालय असलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को- ऑपरेटीव्ह सोसायटीवर ही करवाई झाली आहे. आर्थिक घोटाळ्याप्रकरणी ईडीने सोसायटीची ३३३ कोटी ८२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली. या प्रकरणात ४९ गुन्हे दाखल आहे. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये सुरेश कुटे यांच्या कुटे डेअरी, कुटे सन्स फ्रेश डेअरी या कंपन्यांच्या जमिनी, इमारती, प्रकल्प आणि मशिनरीचा



समावेश आहे. या मालमत्ता सातारा व अहिल्यानगर जिल्ह्यात आहेत. सध्या ज्ञानराधाचा अध्यक्ष सुरेश कुटे, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी कारागृहात आहेत. अनेक ठिकाणी गुन्हे दाखल ज्ञानराधा मल्टीस्टेट को- ऑपरेटीव्ह सोसायटीच्या महाराष्ट्रासह देशातील इतर शहरांमध्ये एकूण ५० शाखा आहेत. या सोसायटीत पावणेचार लाख ठेवीदारांच्या ठेवी होत्या. एकूण तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम ठेवीदारांची अडकली आहे. ठेवीदारांच्या फसवणूक प्रकरणात जालना, छत्रपती संभाजीनगरमध्ये गुन्हे दाखल आहेत. ज्ञानराधा सोसायटीतून परदेशात पैसा गेल्याचा संशय तपास संस्थांना आहे. यामुळे या प्रकरणाचा तपास ईडीकडे देण्यात आला.

## काय आहे प्रकरण

सुरेश कुटे यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट को- ऑपरेटीव्ह सोसायटीत २३१८ कोटी रुपयांचा अपहार करत ते पैसे आपल्या अन्य कंपन्यांत कर्ज रूपाने वळवल्याचा ठपका ईडीने ठेवला आहे. हे पैसे नंतर रोखीने काढून घेत त्याद्वारे त्यांनी वैयक्तिक मालमत्तांची खरेदी केल्याचेही तपासात दिसून आले आहे. या प्रकरणात मनी लॉड्रिंग झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर ईडीनेही याचा तपास सुरू केला होता

## यापूर्वी ईडीकडून मालमत्ता जप्त

अमंलबजावणी संचालनालयाने १० ऑक्टोबर रोजी ज्ञानराधाची मालमत्ता जप्त केली होती. एकूण १००२ कोटी ७९ लाख रुपयांची मालमत्तेवर टाच ईडीने आणली होती. ईडीने जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये मुंबई, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना येथील काही इमारती आणि भूखंड होते.

# बालाघाट अनिलदादांच्या पाठीशी; माता-माऊल्यांनी औक्षण करुन दिल्या विजयासाठी शुभेच्छा!

## मगरूर क्षीरसागरांपासून बीड मुक्त करून मला विकास करायचाय- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी– तळागाळातील मणसांची जाण असणारे सर्वसामान्यांचे नेतृत्व मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौ–यास मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळत असून ग्रामीण भागातील मतदार औंदा दादा तुम्हीच आमदार आशा प्रतिक्रिया व्यक्त करत विजयासाठी शुभेच्छा देत आहेत. विशेष म्हणजे गावागावतील माता–माऊल्यांनी औक्षण काढून दादा तुझ्या पाठीशी आम्ही आहोत, तू काळजीच करू नको म्हणून विजयासाठी आशीर्वाद देखील दिले. काल दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बालाघाटावरील चांदणी, तांदळवाडी



घाट, साखरे बोरगाव, उदंड वडगाव, चौदासवाडी, सफेपूर, रत्नागिरी, गवारी, मांजरसूंबा, सासेवाडी, खंडाळा, कोळवाडी या गावात निमित्त प्रचार गावाक–यांच्या गाठीभेटी घेतल्या तर माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठका देखील घेतल्या. बालाघाटावरील गावागावात मतदारांनी अनिलदादा यांचे आगमन होताच जोरदार स्वागत करत हृदय सत्कार केला. आजवर आम्ही अनेकांना संधी दिली. मात्र प्रत्येकाने आमचा विश्वासघातच केला. आम्ही भूल थापांना बळी पडलोत. पण आता दादा तुम्ही सर्वसामान्यांचा आवाज आहात त्यामुळे औंदा आम्ही पूर्ण ताकदीने आमदार करणार असल्याची भावना बालाघाटावरील गावागावातून मतदारांनी व्यक्त केली. दरम्यान माजी राज्यमंत्री प्रा सुरेश नवले आणि अनिलदादा यांनी कॉर्नर बैठकीत मगरूर क्षीरसागरांपासून बीडवासियांची सुटका करून बीडचा विकास करायचा आहे आणि सामान्यांचे मूलभूत प्रश्न सोडवायचा आम्ही निर्धार केला असून आम्हाला मतदानरुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा नवले यांच्याबरोबर सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता तर गावागावात कॉर्नर बैठकीसाठी मतदारांची देखील भरीव उपस्थिती होती.

# स्थानिक राजकारणाला वैतागून नगरसेवक बाबुराव जाधव घड्याळाची साथ सोडणार

पाटोदा (प्रतिनिधी) अजित पवार राष्ट्र वादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक आमदार बाळासाहेब आजबे काका यांचे कट्टर सम र्थक बाबुराव जाधव घड्याळाची साथ सोडणार ? पाटोदा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काही रिकाम टेकडे पाटोदा तालुक्याचे स्वयंघोषित नेते माझा आवाज दाबण्याचा सतत प्रयत्न करत आसुन पाटोदा तालुक्यात माझ्या लोकप्रियतेमुळे पक्षांतर्गत विरोधक अनेकवेळा गेल्या काही वर्षांपासून माझ्यावर सतत अन्याय करत असताना देखील पण मी नगरसेवक बाबुराव जाधव आमचे नेते आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या निष्ठेमुळे पक्षात राहत होतो मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील पाटोदा तालुक्यातील स्वयंघोषित नेते सतत काही ना काही माझ्यावर कुरगुडी करत असल्यामुळे मी नगरसेवक बाबुराव जाधव आपला पक्ष सोडणार असुन उद्या किंवा परवा मी माझ्या नवीन राजकीय जीवनाची घोषणा करणार आहे निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्र वादी काँग्रेस अजित पवार गटाला एका



पाटो पाट धक्के मिळत असून कालच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर शिवाजीराव राऊत व व माजी जिल्हा परिषद सदस्य रामकृष्ण बांगर यांनी शरद पवार गटात प्रवेश केला असल्याने अजित पवार गटाला आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात मोठे भगदाड पडले असून नगरसेवक बाबुराव जाधव आपला पक्ष सोडणार असल्याने पाटोदा तालुक्यात जोरदार चर्चा असून नगरसेवक बाबुराव जाधव कोणता झेंडा हाती घेतात याकडे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे लक्ष लागले आहे

# बहुजन समाज उभा राहिला डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी पोटभरे यांचा मिळाला पाठिंबा

**प्रतिनिधी बीड**

दि.१० : महायुतीचे बीड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांना अठरापगड जातीधर्माचा पाठिंबा मिळत आहे. बीड शहरात रविवारी (दि.१०) माळी, विरशैव लिंगायत, भावसार, कोष्टी, साळी, गवळी, लोणारी, रंगारी, बुरुड समाजबांधवांशी मेळाव्यातून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी संवाद साधला. विविध समाजाच्या बैठकीत डॉ.योगेश क्षीरसागर यांना जाहीर पाठिंबा देत मोठ्या मताधिक्याने निवडून आणणार असल्याची ग्वाही समाजबांधवांनी दिली. माळी समाजाच्या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसीचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, माजी नगराध्यक्ष बाबुराव दुधाळ, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत, नामदेव दुधाळ, मोहनराव गोरे, सतीश शिंदे, अ‍ॅड..राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक किशोर काळे, लक्ष्मण दुधाळ, नितीन



साखरे यांच्यासह माळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, विविध जातीधर्मांच्या संयुक्त मेळाव्याला डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी संबोधित केले. या मेळाव्यास गवळी समाजाचे नेते तथा भाजपचे शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे, दत्ता परळकर, तेली समाजाचे आदित्य पवार, रजपूत समाजाचे सूरजसिंग जयसिंग चुंगडे, माजलगावकर मठाचे प्रमुख अनिलअप्पा मिटकरी, विरशैव लिंगायत समाजाचे अशोकअप्पा चिफाडे, शिवप्रकशअप्पा कानडे, कोष्टी समाजाचे दगडूअप्पा म्हेत्रे, सुरेश आसलेकर, साळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजू ताटे, भावसार समाजाचे प्रकाश कानगावकर, लोणारी समाजाचे अनिलअप्पा मुळेकर, बुरुड समाजाचे अर्जुन वडतिले यांच्यासह समाजाचे नेते, संघटनांचे पदाधिकारी, समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परशुराम महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांचे स्वागत; वीर सावरकर प्रतिष्ठानचा पाठिंबा

वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानच्या सर्व संस्था संचालक, हितचिंतकांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेत सामाजिक परिस्थिती विषयांवर चर्चा केली. तसेच, परशुराम आर्थिक विकास मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष आशिष दामले यांचे स्वागत केले. यावेळी अनेक समाजबांधव उपस्थित होते. याप्रसंगी वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने डॉ.योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा देण्यात आला.

## बाबुराव पोटभरे यांचा मिळाला पाठिंबा

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोठभरे यांची भेट घेऊन पाठिंबा देण्याची विनंती केली. काल बाबुराव पोटभरे यांनी बीडमध्ये पक्षाची बैठक घेतली. त्यांनतर पत्रकार परिषद घेऊन जाहीर पाठिंबा दिला. या बैठकीस महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे देखील उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ११ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# काकड आरती म्हणजे कायहो, गुरुजी?

(काकड आरती विशेष.)

काकड आरती म्हणजे हिंदू धर्मात देवाला उठवण्यासाठी पहाटेच्या वेळी केलेली आरती होय. या वेळी देवाच्या मूर्तीला काकडा- एक प्रकारच्या ज्योतीने ओवाळले जाते, म्हणून याला काकडारती असे म्हणतात. भारतातील अनेक मंदिरांमध्ये पहाटे काकड आरती केली जाते. महाराष्ट्रामध्ये बहुतांशी मंदिरातून नित्य किंवा काही विशिष्ट काळात, विशेषतः कार्तिक महिन्यात काकड आरती केली जाते.

कार्तिक महिन्याच्या शुक्ल एकादशीपासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटे देवाला जागविण्यासाठी मंदिरात काकडारती करण्याची पद्धत प्रचलित आहे. आरतीनंतर विविध भजने, अन्य आरती व स्तोत्रे म्हटली जातात. कृष्णाच्या लीला वर्णन करणारी गीतेही यामध्ये म्हटली जातात. संत तुकाराम, संत रामदास, संत एकनाथ, संत सावतोबा, संत चोखोबा, आदी संतांनी काकड आरती रचल्या आहेत. त्यात त्यांचा व अभंगांचा समावेश असतो. काकड आरतीचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात विविध गावांमध्ये विविध उपक्रम केले जातात. काही ठिकाणी कार्तिक महिन्यात रथोत्सवासाठी गावकरी एकत्र जमतात आणि सोहळ्याचा आनंद घेतात. काही गांवी शेवटी गोपाळकाला करून सांगता केली जाते.

"भक्तिचिये पोटी बोध काकडा ज्योति|
पंचप्राण जीवे-भावे ओवाळू आरती||
ओवाळू आरती माझ्या पंढरीनाथा|
दोन्ही कर जोडोनि चरणी ठेविला माथा||"

कोजागरी पौणिमेपासून काकड आरतीला सुरुवात होते आणि त्रिपुरारी पौर्णिमेर्पंत काकड आरतीचा अखंड गजर सुरू असतो. वारकरी संप्रदायामध्ये काकड आरतीला फार पूर्वीपासून महत्त्व आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वच मंदिरामध्ये पहाटेच्या काकड आरतीचा मधुर स्वर निनादतो. एक महिना चालणारा उत्सव निद्रिस्त देवादिकांना जागविण्यासाठी केला जातो, अशी समजूत आहे. खरे तर शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी वर्ग थंडीमुळे आळशी बनू नये, सकाळी लवकर उठून नव्या जोमाने कामाला लागला पाहिजे, याच उद्देशाने काकड आरतीची परंपरा जोपासली जात आहे, असे कोणत्याही जाणकाराच्या श्रीमुखातून ऐकण्यास मिळेल, हेच खरे! एकेकाळी सर्व गावकरी, परिसरातील लोक एकत्रित सामुहिकपणे काकडत काकडत काकडा आरती करीत. त्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात होते. परंतु अलिकडच्या काळामध्ये काकडा आरतीमधील गर्दी ओसरू लागली आणि काकडा आरतीमध्ये येणाऱ्या तरूणांची संख्याही कमी झाली. ही फारच चिंतेची बाब! आता केवळ गावातील ज्येष्ठ पुरुष, महिला मंदिरात एकत्र येऊन काकडा आरती करतात. गावांमध्ये काकडा आरतीमध्ये टाळ, मृदूंग, चिपड्यांच्या तालावर भजने सादर होतात.

"काय महिमा वर्णू आता सांगणे ते किती|
कोटी ब्रह्महत्या मुख पाहता जाती||
राही रखुमाबाई दोन्ही उभ्या दो बाही|
मयुरपिच्छ चामरे ढाळीती ठाईच्या ठाई||"

आताही अनेक गावांमध्ये ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. पहाटेच्या समयी घरातील ज्येष्ठ भाविक उठून, स्नान आटोपून मंदिरात जाऊन काकड आरती करतात. पहाटे उठून शुद्ध हवा मिळावी. आरोग्य सुदृढ राहावे. असाही काकड आरतीमागील उद्देश असू शकतो. त्यामागे आरोग्यविषयक भावना निश्चितच दडलेली आहे. परंतु बहुतांश भाविक काकड आरतीकडे धार्मिक दृष्टीकोनातूनच पाहतात. मंदिरातील काकड आरती आटोपल्यानंतर भाविक "जय जय रामकृष्ण हरी...!" असा गजर करीत, टाळमृदूंगाच्या तालात नगराला प्रदक्षिणा घालतात. चातुमार्सात देव- भगवान विष्णू म्हणजेच विठ्ठल हे निद्रेमध्ये असतात. त्यांना उठविण्यासाठी ही काकड आरतीची परंपरा असल्याचे बोलले जाते. आरती दरम्यान तीन मंगलाचरण, काकड आरतीचे अभंग, भूपाळ्याचे अभंग, पूजेची ओळ, सातवी मालिका, वासुदेव, आंधाळा पांगुळ, मुका, बहिरा, गौळणी आदींसह गणपतीची, भैरवनाथाची, विठ्ठलाची आरती होते. त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप होते. पांडूरंगाष्टक, कालभैरवाष्टक झाल्यानंतर काकड आरतीची समाप्ती होते. या काकड आरतीची त्रिपुरारी पौर्णिमेला सांगता होते.

"विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा||
सत्त्व-रज-तमात्मक काकडा केला|
भक्ति स्नेहे युक्त ज्ञानाग्नीवर चेतविला||"

ही आपल्याकडे कित्येक हजारो वर्षांपासून सुरु असलेली पद्धत आहे. देवपूजा करताना आरती ही अगदी हमखास गायली जाते. आरती ही एक प्रकारे देवासाठी गायली जाणारी स्तुतिसुमने आहेत. जी आपण छान चाल लावून गातो. गणेशोत्सव, नवरात्र या काळात आरती ही अगदी हमखास गायली जाते. परंतु काकड आरतीचे एक वेगळेच महत्व आहे. कारण पहाटे जी गायली जाते, म्हणून तीला काकड आरती म्हणतात. कोणत्याही देवस्थानाला भेट देताना लोक पहाटेची काकड आरती अजिबात चुकवत नाहीत,

# आशा...

जीवन जगण्याचा एक मार्ग म्हणजे आशा आहे.

अगदी लहानपणापासून ते म्हातारा होईपर्यंत आशा पल्लवीत जातात. या आशा कधी पूर्ण होतात तर कधी होत नाहीत.

लहान बाळ आहे ते कधी चालेल, स्वतःचे काम ते स्वतः कधी करेल, इथून आशाला सुरुवात होते. काही मुलांचा प्रोग्रेस लवकर होतो तर काही मुलांचा प्रोग्रेस उशिरा होतो. मग तिथे आशा आहे ती निराशेला पकडायला सुरुवात करते. त्यावेळी निराशा डोके वर काढते.

मग मूल चांगले शकेल का हुशार होईल का? समाजात सगळ्यांना सामावून घेईल का? सर्व त्याला सामावून घेतील का?

अशा अनेक प्रश्नांच्या आशा आपल्या मेंदूत निर्माण होतात.

मुलं कॉलेजला गेल्यावर हायर क्लास मिळवायलाच हवा!हा आपला अट्टाहास असतो. कारण समाजात त्याला स्वतःचं स्थान निर्माण करायचं असतं. ही आपली एक मोठी अशी असते पण ती कधी पूर्ण होते कधी पूर्ण होत नाही. म्हणून वाईट मार्गाला लागेल असे नाही

अशा या कायम सकारात्मक ठेवाव्यात. आशा पूर्ण झाल्या तर खूपच छान. पण नाही झाल्या तर निराश होण्याचा कारण नाही. त्या मुलाला योग्य वाटत होण्याचं काम आपण करायचे असते.

आता लग्न झाले. मुलाला मुलगी मुलीला मुलगा योग्य तो मिळाला. आता त्याला पहिला मुलगा की मुलगी होईल??

मग काही ठिकाणी मुलगाच हवा ही आशा असते. ही आशा बऱ्याचदा नवऱ्या मुलीला त्रासाचे होवू शकते. यासाठी जे होईल ते होईल फक्त पहिल मुल बाळ छान होवू दे. असे आपण वागायला हवे.

आपले आई वडील म्हातारे होतात, त्यांची कामे त्यांनी स्वतःच करायला हवेत, असा आपला अट्टाहास असतो. पण बऱ्याचदा त्यांचे कार्य त्यांना हाताने जमत नाहीत. घराच्या गोष्टींसाठी त्यांना इतरांची मदत घ्यावी लागते. अशावेळी आपण त्यांना मदत करणं गरजेचं असतं. प्रत्येकाच्या बाबतीत आपण आशा करणं सोडून दिल्या पाहिजेत. अथवा आशा करा पण ती पूर्ण होईल अशी अपेक्षा करू नका. असे माझे वैयक्तिक मत आहे.

जीवन हे आशा- निराशावर चाललेले आहे. प्रेम राग, मत्सर या सर्व भावना आहेत. या सर्व भावनांचा आदर करून आपण जीवन जगायला शिकायला हवे.

चांगल्या भावनांची जपणूक करायची. वाईट भावनांना थारा द्यायचा नाही.

बघा प्रयत्न करून सहज शक्य आहे. प्रत्येक माणसाने आशा ह्या कराव्यातच पण त्या पूर्ण होतील हा अट्टाहास धरू नये.

वसुधा वैभव नाईक,पुणे

# सुखी जीवन जगण्याचा सोप्पा मार्ग कोणता ?

रतन टाटा यांचे आदर्श जीवन चरित्र किंवा जीवनशैली! ङ्गजगणे व्हावे गाणेफ हे आपल्या आनंदी, समाधानी वृत्तीतून व साध्या राहणीतून, निर्मळ, निकोप आचारविचारातून, सामाजिक योगद–ानाच्या कृतीतून, निसर्ग, प्राणीप्रेमातून रतन टाटा शिकवून गेले. ङ्गआनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चोहीकडे!फ या बालकवींच्या मन प्रफुल्लित करणाऱ्या गीताचे शब्द लतादीदींच्या सुमधुर स्वरात जेव्हा कानावर पडतात, तेव्हा खरोखर जीवन हे आनंद गाणे असून ते ङ्गगातची रहावेफ असेच वाटत राहते. माणसाचे आयुष्य सुखा–वह होण्यासाठी त्याने आपले जगणे हे आनंदी वृत्तीने जगले पाहिजे. अर्थात, माणसाच आयुष्य हे सुखदुःख, यश अपयश, आशा निराशा, अकल्पित संकटे, अडचणी यांनी भरलेले असते. सहजासहजी सुखावह जीवन जगणे हे कोणालाच शक्य नसते. जीवनातल्या प्रतिकूलतेवर, बिकट परिस्थिवर मात करत आनंदाने जगणे ही एक कला आहे व ती आत्मसात करणं मनुष्याला जमायला हवं. तेव्हाच जगणं हे आनंद–गाणे होते. सुख, शांती, समाधान, आनंद, प्रसन्नता... हे जगण्याचे आनंद–गाणे करणारे प्रमुख घटक. असा आनंद प्राप्त झाला की तो चेहऱ्यावर उतरून चेहरा समाधानांने, प्रसन्नतेने उजळत–ो. या अंतर्यामीच्या आनंदी, समाधानी वृत्तीने मनुष्य काही तरी गुणगुणायला लागतो. ही आनंदी वृत्ती चित्तात ठसली पाहिजे किंवा असली पाहिजे. तेव्हाच मनुष्य प्रतिकूल, बिकट परिस्थिती–वर मात करत जीवन आनंदाने जगू शकतो वा जगण्याचे आनंदगाणे करू शकतो. त्यासाठी सकारात्मक वृत्ती हवी. स्वभाव सकारात्मक असेल तर मनुष्य अगदी लहानसहान, किरकोळ गोष्टींतून आनंद वेचून मजेत जगू शकतो. जीवनाचा उपभोग घेत असताना अनेक घटकांतून, प्रसंगातून दाही दिशांत पसरलेला आनंद शोधून तो टिपकागदाप्रमाणे टिपायची वृत्त–ीही असली पाहिजे किंवा तशी सवय लागली पाहिजे. आनंद शोधणे, तो टिपणे, लुटणे.. ही एक संधीच असते. या आनंदात इतरांनाही सामील करून घेता आले पाहिजे. याचे उत्तम उद–ाहरण म्हणजे नुकतेच निधन पावलेले रतन टाटा यांचे आदर्श जीवन चरित्र किंवा जीवनशैली! ङ्गजगणे व्हावे गाणेफ हे आपल्या आनंदी, समाधानी वृत्तीतून व साध्या राहणीतून, निर्मळ, निकोप आचारविचारातून, सामाजिक योगद–ानाच्या कृतीतून, निसर्ग, प्राणीप्रेमातून रतन टाटा शिकवून गेले. सुदैवाने, आपल्या मराठी संगीत प्रांतात चित्तवृत्ती प्रसन्न करणारी, मनावर आनंदसरींचा वर्षाव करणारी अनेक दर्जेदार आनंद–गाणी, कविता, श्लोक, अभंग, भारूड अशा अवीट गोडीच्या रचना आहेत. ती ऐकून आपण जीवनावर प्रेम करू लागतो. ङ्गया जगण्यावर शतदा प्रेम करावे!फ हे सकारात्मक वृत्तीचे गाणे त्यांचे प्रातिनिधिक उदाहरण ठरावे. निसर्ग अवलोकन, साहित्य रसास्व–ाद, संगीत, नृत्य, नाटक आदी कला व क्रीडा यांची आवड व्यक्तीच्या जी–वनात आनंद फुलवते. दर्जेदार विन–ोद, किस्से ऐकून मनावरील ताणतणाव क्षणात दूर होऊन मन हलकेफुल–के होते. लहान मुलांचे खेळ बघताना त्यात रममाण झाल्याने वेदना, चिंता विसरल्या जाऊन आनंदाची अनुभूती येते. कुंडीत रोवलेल्या रोपाला जेव्हा फूल येते तेव्हाचा आनंद तर अवर्णनीय व अनुपमेय असाच असतो. रोजच्या जीवनातील अशा अनेक आनंदद–ायी प्रसंगातून जीवन गाणे समृद्ध होते. या व्यतिरिक्त अशा काही कृतिशील गोष्टी आहेत की त्या केल्याने इतर–ांच्या जीवनातही आनंद फुलू शकत–ो. परोपकारासारखा दुसरा आनंद नाही. विशेषतः कोणी दुःख संकटात, अडचणीत असताना त्याला आर्थिक तसेच शारीरिक मदत जगणे समृद्ध करते. निकोप यशाबद्दल दुसऱ्याचे अभिनंदन करणे, त्याचे कौतुक करणे, अनोळखी व्यक्तीचे स्मितहास्याने स्व–ागत करणे अशा लहानसहान प्रसंगांतून जीवनातील आनंदबागा फुलवता येतात. जगणे हेच एक आनंदगाणे होण्यासाठी मात्र माणसाला काही गोष्टींचे अवधान राखावे लागते. काही नियमांच पालन करावे लागते. सकारात्मक वृत्ती, स्वयंशिस्त, विचारांची निश्चित बैठक, कोणत्या न कोणत्या कार्यात स्वतः ला गुंतवून ठेवणे, अशी जीवनधारणा असेल तरच जगणे आनंदगाणे होईल

# माझ लातूर

लातूर हे एक शहर शैक्षणिक आणि उद्योगाचे शहर आहे .

हे मराठवड्याचा हा एक अंग आहे , लातुरची माणस सगळ्या वाऱ्या करतात विठ्ठलाच्या म्हणुन ते देवाला जास्त मानतात , जो सगळ्यांना आवडणार आहे.

लातूर या शहरामध्ये अनेक देवस्थान आहेत. लातूर मधला तो किल्लारीचां भयानक भूकंप कसे विसरणार सगळे माणसं कधी दुःख तर कधी सुख लाभले या लातूर जिल्ह्याला होते.

त्या मध्ये जगदंबामाता मंदिर गंजगोलाई सूरत शावली दर्गा लातूर सिद्धेश्र्वर आणि रत्नेश्वर मंदिर लातूर सिद्धेश्र्वर आणि रत्नेश्वर मंदिर हट्टेनगर लातूर , श्री केशव बालाजी मंदिर बुद्ध गार्ड्न (मंदिर) श्री विराट हनुमान मंदिर आहेत. लातूर शहरा मराठवाड़ा असल्यामुळे ईथे साखराचे कारखाने भरपूर आहे .ईथे ऊस , ज्वारी , कडधान्य या शहरात पिकवल जातात आणि हि कड़ची मातीमाय काळी काळी भोर असतात , या मध्ये काही पिक घेऊ शकतात , पण काही दिवस हे लातूर शहरामधली गाव दुष्काळग्रस्त झाला होतो .या गावा गावंत मध्ये भरपूर शेतकऱ्यानी आत्महत्या ही केले होते . लातूर शहरा मधले उदगीर , औसा , निलंगा असे अनेक शहर आहेत जे सुंदर आहेत. लातूर शहरामध्ये एकच आवाज नेहमी गूंजतो तो म्हणजे ( श्री मा. विलासराव देशमुख )याच हे शहर आहे . या शहराला या महान नेत्यांनी भरपूर काही केल आणि दिल सुधा पण आता ते नाहीत त्याची पोर हे वारसा चालवत आहे . यांचे गुणगान किती ही गायले तरी कमीच आहे .माझी ही नाळ जोडली गेलेली आहे , मी ही या शहराचा एक भाग आहे , म्हणुन लातूर माझ आवडत शहर आहे .मी मुंबईत राहून सुधा लातूर शहराचा सन्मान करतो. म्हणुन म्हणतो मी लातूर शहर आहे लय भारी .

मी लातूरकर मी लातूरकर

**प्रमोद न सूर्यवंशी**

# श्री.संत बाळु मामांच्या मेंढी माऊली व पालखी सोहळा लिंबागणेश मुक्कामी

**लिंबागणेश प्रतिनिधी :** ---

लिंबागणेश:– ( दि.१० ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे काल दि.१० वार शनिवार रोजी श्री संत सद्गुरू बाळु मामांच्या मेंढी माऊली आणि पालखी सोहळ्याचे मुळुकवाडी येथील मुक्काम उरकुन लिंबागणेश येथे पालखी सोहळ्याचे ढोल ताशांच्या गजरात आतिषबाजी करत भाविकांनी तर महिला भगिनींनी सडासमार्जन करून रांगोळी काढत मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.पालखी लिंबागणेश मुक्कामी विसावली आहे. याबाबत माहिती देताना श्री संत बाळूमामा पालखी सोहळ्याचे प्रमुख गुरव कारभारी आप्पा माळी म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एकूण १९ पालख्या आहेत. त्यात जवळपास ३ लाख मेंढी असुन लिंबागणेश मुक्कामी पालखी बग्गा नंबर ९ असुन यामध्ये ३००० मेंढी आहेत.

लिंबागणेश पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्री संत बाळु मामांच्या मेंढी माऊलींना पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली आहे. लिंबागणेश येथील शेतक□्यांनी आवर्जून बाळु मामांच्या मेंढ्यांना आपल्या शेतात नेऊन चारा खाण्यास घालत आहेत.



पालखी सोहळ्याच्या निमित्ताने दररोज सकाळी ९ वाजता श्रींची आरती व महाप्रसाद , सायंकाळी ६ ते ७ यावेळेत हरिपाठ आणि सायं ७ ते रात्री ९ कालावधीत बाळु मामांच्या जीवन चरित्र पर किर्तन होऊन रात्री ९ वाजता आरती व त्यानंतर महाप्रसाद असे नियोजन पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडून करण्यात आले आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ११ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# २०१९ च्या निवडणुकीत जो राम होता, तो २०२४ ला रावण कसा झाला?

## वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, भगवान सेनेचे जिल्हाप्रमुख विरेंद्रसिंह सानप यांचा सवाल

बीड (प्रतिनिधी)दि.१० : २०१९ च्या निवडणुकीत आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हृदयात स्थान असलेले पालकमंत्री ना.धनंजय मुंडे हे त्यांच्यासाठी ङ्गरामफ होते. आता २०२४ च्या निवडणुकीत असे काय घडले की ते अचानक रावण झाले? असा सवाल वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, भगवान सेनेचे जिल्हाप्रमुख विरेंद्रसिंह सानप यांनी प्रसिध्दीपत्रकातून उपस्थित केला आहे.

पत्रकात पुढे म्हटले की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची सभा बीडमध्ये पार पडली असून या सभेतून बीडचे निष्क्रिय आमदार संदीप क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली. हेच धनंजय मुंडे मागील निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांच्या हृदयात होते. अगदी मोठे बंधू, माझे नेते असा उल्लेख आमदार आवर्जून करत असत. त्यांच्याच नेतृत्वाखाली संदीप क्षीरसागर यांच्या राजकीय कारकीर्दीला खऱ्या अर्थाने बळ मिळाले. त्यांच्या विजयासाठी धनंजय मुंडे यांनी केलेले प्रयत्न आता ते विसरले आहेत. सातत्याने जातीवादाचे विष पेरणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ओबीसी नेत्यांना टार्गेट केले जात आहे. त्याचाच भाग म्हणून संदीप क्षीरसागर यांनी शरद पवार यांच्यासमोर धनंजय मुंडे यांच्यावर रावण म्हणून टीका केली. यापूर्वी आमदारांनी स्वतःच्या चुलत्याला रावण म्हटले होते. त्यामुळे त्यांनी स्वतःचा चष्मा बदलून घ्यावा. सोयीनुसार गरज संपली की इतरांना रावण म्हणणे बंद करावे. नेत्यांवर अशी टीका केल्याने काहीही साध्य होणार नाही. त्यांनी पाच वर्षात बीडच्या जनतेसाठी काय केलं याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा. यापुढे धनंजय मुंडे यांच्यावर पातळी सोडून टीका केल्यास समाज खपवून घेणार नाही, असा इशारा वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, भगवान सेनेचे जिल्हाप्रमुख विरेंद्रसिंह सानप यांनी दिला आहे.



### आमदारांनी ओबीसींसाठी काय केले?

बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विधानसभा मतदारसंघातील ओबीसींसाठी पाच वर्षात काय केले? याचे उत्तर त्यांना या निवडणुकीत द्यावे लागेल. ओबीसींच्या अनेक गावात निवडून आल्यानंतर ते पुन्हा फिरकले देखील नाहीत. त्या गावात त्यांनी एक रुपयाचा निधी दिला नाही. अशा गावातील जनतेतून संताप व्यक्त केला जात आहे

---

# मराठवाडा साहित्य परिषदेच्या निवडणुकीत डॉ.दिपाताई क्षीरसागर विजयी

**बीड (प्रतिनिधी)**

दि.११ : साहित्य क्षेत्रात मराठवाड्यात मागील साधारणतः सात-आठ दशकांपासून कार्यरत असणाऱ्या नामांकित अशा मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत प्राचार्य डॉ.दिपाताई भारतभूषण क्षीरसागर मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. त्यांच्या या विजयाबद्दल साहित्य, संस्कृती आणि लेखन - संशोधनाच्या क्षेत्रात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर या सुप्रसिद्ध दिवंगत कवयित्री सुहासिनी इर्लेकर यांच्या कन्या असून मराठी साहित्यातील एक आघाडीच्या लेखिका म्हणून त्या सुपरिचित



आहेत. लेखन, संशोधन, संपादनासाठी त्यांनी दिलेले योगदान साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण मानले जाते. साधारणत: दीड डझन ग्रंथांचे लेखन-संपादन त्यांनी केले असून बीड शहर आणि परिसरात सातत्याने साहित्यिक -सांस्कृतिक उपक्रम त्या राबवत आलेल्या आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा बीड आणि अखिल भारतीय मराठी बालरंगभूमी शाखा बीड यासंदर्भात त्यांनी केलेले कार्य अत्यंत भरीव स्वरूपाचे आहे. त्यांच्या या विजयामुळे बीड परिसरातील साहित्यिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या काळात बीड परिसरातील साहित्यिक चळवळ अधिक जोमाने पुढे जाईल असा विश्वास नागरिकातून व्यक्त केला जात आहे.

# खर्च लेखे सादर करण्याबाबत नोटिसा

बीड, दि. १० : आष्टी विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवणा-या उमेदवारांच्या खर्चाच्या लेख्यांची पहिली तपासणी शुक्रवारी (ता.८) खर्च निरीक्षक यांच्या उपस्थितीत आष्टीच्या उपकोषागार कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात झाली. त्यानुसार उमेदवार महेबुब इब्राहिम शेख, प्रदीप चव्हाण यांना निवडणूक खर्चाचा हिशोब विलंबाच्या कारणांसह, तर सुरेश धस, बाळासाहेब आजबे, भिमराव धोंडे यांना लेख्यातील तफावत संदर्भात ४८ तासात खुलासा सादर करावा, अशा नोटिसा लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ नुसार बजावल्याचे आष्टीच्या निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी कळविले आहे.

*****

---

# मराठा, मुस्लिम पदाधिकारी, कार्यकर्त्यांची वाट लावणार्यांना आत्ताच पुळका का?

## माजी सभापती काकासाहेब जोगदंड, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांचे पत्रक

बीड (प्रतिनिधी)

दि.११ : गेल्या पाच वर्षात मराठा-मुस्लीम समाजातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सर्व सामान्यांची वाट लावणार्या आमदारांना आत्ताच मराठा आणि मुस्लिम समाजाचा पुळका का आला? असा सवाल माजी सभापती काकासाहेब जोगदंड आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांनी उपस्थित केला.पत्रकात पुढे म्हटले आहे की, गेल्या पाच वर्षात मराठा आणि मुस्लिम समाजाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर आमदारांनी सातत्याने अन्याय केला. सोबत असलेल्या काही ठराविक लोकांच ऐकून त्यांनी अनेक जिवाभावाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर केलेला अन्याय अख्ख्या बीड जिल्ह्याने पाहिला आहे. मराठा समाजातील काकासाहेब जोगदंड, डॉ.जोगदंड, महादेव उबाळे, सचिन शेळके, नंदकुमार कुटे, बळीराम गवते, रमेश चव्हाण, पंडित अरबने, पिनू तावरे, अमर नाईकवाडे यांच्यासह



अनेक मराठा पदाधिकारी, कार्यकर्ते आमदारांपासून दुरावले. त्याचबरोबर मुस्लीम समाजातील जेष्ठ समाजसेवक मोईन मास्टर, फारूक पटेल, अशपाक



इनामदार, जैतुल्ला खान, शेख एकबाल, बरकत पठाण, समीर तांबोळी यांच्यासह इतरही अनेकजण आमदारांपासून दुरावले. मराठा आणि मुस्लीम समाजातील दिग्गज आणि जनतेतील चेहरे असलेले हे सर्वजण त्यांच्यापासून दुर गेले. मात्र आमदारांनी पाच वर्षात कधी याविषयी चिंतन केले नाही. मात्र ऐन विधानसभा निवडणूकीच्या धामधूमीत याच आमदारांना मराठा आणि मुस्लीम समाजाची आठवण कशी झाली ? ज्या मुस्लीम समाजाच्या मतदांवर ते निवडून आले, आमदार झाले मात्र आमदार म्हणून काम करत असतांना गेल्या पाच वर्षात या आमदारांना कधी मुस्लीम समाजाची आठवण का झाली नाही ? आत्ताच त्यांना मराठा आणि मुस्लीम या दोन्ही समाजाचा पुळका का आला ? असा सवाल माजी सभापती काकासाहेब जोगदंड आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांनी प्रसिध्दीपत्रकातून उपस्थित केला आहे.

# शरद पवार आले अन् टीका करुन गेले; मराठवाड्यासह बीड जिल्ह्यास निराशा

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात परळी आष्टी व बीड या तीन ठिकाणी काल जाहीर सभा घेतल्या. आपल्या भाषणातून इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र व अर्थशास्त्र मांडणाऱ्या पवारांनी बीड जिल्ह्यात मात्र नेहमीचाच कित्ता गिरवत बीड जिल्हा वासियांची घोर निराशा केल्याचे पाहायला मिळाले. परळी सह उर्वरित दोनही सभांमध्ये शरद पवारांकडून कोणत्याही विकासाच्या मुद्द्याला हात घालण्यात आला नाही. उलट आपल्या स्वभावाच्या विपरीत जाऊन आपल्याच पक्षात काम केलेल्या जुन्या तरुण सहकाऱ्यावर टीका करण्यात शरद पवारांनी धन्यता मानल्याचे पाहायला मिळाले. ते आले अन् फक्त टीका करुन गेले अशी चर्चा सुरू झाली आहे. बीड जिल्हा हा कमी पावसाचा व दुष्काळी समजला जातो त्यामुळे येथील बहुतांश लोकसंख्या अजूनही आर्थिक दृष्ट्या मागास आहे.

---


# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ

## मन्मथ स्वामींची कार्तिक पौर्णिमेची ४५० वर्षाची अखंडित परंपरा आजही कायम

बीड । प्रतिनिधी

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंडामध्ये त्यांनी कीर्ती केली.महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. मसंत ज्ञानेश्वरफ आणि मसंत मन्मथ स्वामीफ मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षां पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून मश्रीक्षेत्र कपिलधारफ महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड, श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येर्णाया १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात.

या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे.४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म माघ शुद्ध पंचमी १४८२ ला झाला.जगाला पवित्र करण्याचे सामर्थ्य या वीरशैव कुळामध्ये आहे. त्याच कुळामध्ये ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी मन्मथ स्वामी यांच्या आई पार्वती आणि वडील शिवलिंग स्वामी यांच्या पोटी झाला. मन्मथ स्वामी यांचा जन्म दिनोदर बाबा यांच्या आशीर्वादाने झाला होता. त्यांनी शिव सांप्रदायाचा पाया रोवाला तसेच लिंगायत वीरशैव साहित्याचे व समाजाचे ते जनक आहेत. भजन कीर्तन नामस्मरण



ही परंपरा त्यांनी चालू केली. तसेच मन्मथ माऊलींनी शिव संप्रदायाचा पाया रचला व क्लस हा शिवसंत लक्ष्मण महाराजांनी रचला. लक्ष्मण महाराजांची समाधी जोड आष्टी येथे आहे. मन्मथ माऊलींनी पहिली ध्वज पताका खांद्यावर घेऊन कपिलधार ते शिखर शिंगणापूर पदयात्रा काढली.

### या ठिकाणची आख्यायिका

या ठिकाणी कपिल मुनी यांचं वास्तव्य होतं. कपिल मुनी यांची गंगासागर येथे समाधी आहे. कपिल मुनी हे तपस्वी असल्यामुळे त्यांनी हे क्षेत्र दिनोदर बाबा यांच्या ओटीमध्ये टाकलं म्हणजे त्यांना दान केलं. दिनोदर बाबा हे एक तपस्वी महाराज होते. ते या ठिकाणी असलेल्या पंचकुंडाच्या ठिकाणी गुप्त झाले. त्याअगोदर दिनोदर बाबा यांनी हे तीर्थक्षेत्र मन्मथ स्वामी यांना स्वाधीन केलं होतं. मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी तपश्चर्या करून वयाच्या २६ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली.

### संजीवनी समाधी घेणारे महाराष्ट्रातील दुसरे संत

मन्मथ स्वामी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जार्णाया कपिलधार या ठिकाणी गेले. ४५९ वर्षापासूनची ही परंपरा व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. संजीवनी समाधी घेणारे हे महाराष्ट्रातील दुसरे संत म्हणून ओळखले जातात. मन्मथ स्वामी यांनी मपरम रहस्यफ हा ग्रंथ कपिलधार या ठिकाणी लिहिला. त्यावेळी त्याठिकाणी दुसरं प्राणी देखील वास्तव्यास होते. अनेक वाघ, सिंह, साप या ठिकाणी वास्तव्य होते. ज्यावेळी मन्मथ स्वामी त्या ठिकाणी तपश्चर्या करत असत त्यावेळी त्यांच्या अंगा खांद्यावर साप खेळत असत असा त्यांचा अनेक वर्षापासूनचा इतिहास आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार ११ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# कांदा आणि लसण राजकीय समीकरणं बिघडवणार? ; तुटवडा वाढल्याने झाली दरवाढ, ऐन हिवाळ्यात ग्राहकांना फुटला घाम





**मुंब ईप्रतिनिधी**

कांदा आणि लसणाने ऐन निवडणुकीत सत्ताधाऱ्यांचं टेन्शन वाढवलं आहे. मुंबईत कांदा आणि लसणाच्या तुटवड्याने मुंबईकरांच्या जेवणाची चव हरवली आहे. कांदा आणि लसणाच्या पेस्टने रोजच्या जेवणाला रंगत येते. ते रूचकर आणि चविष्ट लागते. पण या दोन महत्त्वाच्या जिन्नसच हरवल्याने मुंबईकरांच्या जेवणाची चव हरवली आहे. कांदा आणि लसणाच्या तुटवड्याने किंमती वाढल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर नागरिकांनी दरवाढीवर नाराजी व्यक्त केली आहे

### कांद्याचे भाव भडकणार?

कांद्याचे भाव आणखी महिनाभर वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सुद्धा कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्याने हा तुटवडा जाणवत आहे. दिवाळीमुळे नाशिक परिसरात कांद्याची खरेदी-विक्री आठवडाभर बंद होती. यंदा पावसाने कांद्या मोठ्या प्रमाणात खराब केला आहे. खरीप कांद्याच्या काढणीवर त्याचा परिणाम दिसून आला. उत्पादनात मोठी घट झाल्याने बाजारात कांद्याचा तुटवडा आला आहे. आता या समस्येवर सरकारला लवकरात लवकर तोडगा काढावा लागणार आहे. नाहीतर कांदा हा विधानसभा निवडणुकीतील

### असा वाढला भाव

मुंबईतील बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाला आहे. कांदा ८० रुपये किलोवर तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला आहे. मुंबईत किरकोळ बाजारात कांदा ६० ते ८० रुपये किलो दराने विक्री होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे. पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन – चार महिने लसणाचे वाढ चढेच राहणार आहेत.

### का झाला तुटवडा

दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी – विक्री आठवडाभर बंद होती. परिणामी बाजारांत काद्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपला आहे. किरकोळ प्रमाणात दोन ते पाच टक्के उन्हाळी कांदा शेतकऱ्यांकडे शिल्लक आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून पुणे, मुंबईसह राजधानी दिल्लीत दर्जेदार कांद्याचे दर ८० रुपयांवर गेले आहेत. खरीप हंगामातील नुकताच काढलेला, पाण्याचे प्रमाण जास्त असलेला कांदा ६० रुपये किलो दराने विक्री होत आहे.

# आखिर सच उगल दिया २ या हिंदी गुन्हेगारी विश्वावर आधारित वेबसीरिजचे चित्रीकरण नुकतेच संपन्न!

पनवेल (प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर) ङ्गआखिर सच उगल दिया ङ्ग या पहिल्या वेबसिरीजच्या भव्य दिव्य यशानंतर ङ्गआर्यारवी एंटरटेनमेंटङ्ग आपणासमोर घेऊन येत आहे ङ्गआखिर सच उगल दिया – भाग २ङ्ग प्रमोद दळवी यांच्या संकल्पनेतून साकारलेली, महेश्वर तेटांबे निर्मित आणि दिग्दर्शित ङ्गआखिर सच उगल दिया २ङ्ग या हिंदी वेबसिरीज भाग २ चे चित्रीकरण नुकतेच पनवेल नगरीतील काळुंद्रे या गावांत संपन्न झाले. गुन्हेगारी विश्वावर आधारित आणि गुन्ह्यांचा अचूक वेध घेणा–या ह्या वेबसीरिजमध्ये अनेक नामवंत कलावंतांनी सहभाग घेतला. त्यांत प्रामुख्याने सुनील पाटेकर, रवी मोरे, रुपेश पालव, अविनाश राऊत, सुरेश डाळे पाटील, अरुण धावडे, एम नटराज, गीता कुडाळकर लक्ष्मी गुप्ता, बाळाराम चिखलेकर, प्रमोद दळवी, विशाल म्हसकर, गुरुनाथ तिरपणकर, ज्येष्ठ नाट्य अभिनेते राम सारंग, मंगल यादव, नृत्य दिग्दर्शक मनोज जाधव (एम जे), नामदेव मोहिते, सारिका विजय जाधव, शिमोन डेविट सकट, बालकलाकार आराध्या, जयश्री, शौर्य दिनेश मोहित आदी सर्व कलावंतानी महत्वपूर्ण भूमिका साकारली आहे. पटकथा–संवाद महेश्वर तेटांबे यांचे असुन या वेबसिरीज साठी छायाचित्रणाची



महत्वपूर्ण जबाबदारी मकरंद अनंत पांचाळ यांनी पार पडली असून सोनाली पेडणेकर यांची रंगभूषा लाभली आहे. संकलन आणि संगीत तसेच ध्वनिमुद्रणाची जमेची बाजू महेश मोरे यांनी सांभाळली आहे. तर सहाय्यक दिग्दर्शन अक्षय भोसले यांनी केले आहे. या संपुर्ण वेबसिरीजचे व्यवस्थापन अरुण धावडे आणिलक्ष्मी गुप्ता यांनी केले. या वेबसिरीजमध्ये काम करणा–या सर्व कलावंतांची तीन दिवसीय भोजन व्यवस्था सौ.मंगल यादव (करंजाडे) यांनी केली. या वेबसिरीज साठी प्रसिद्ध समाजसेवक, अभिनेते खलील शिरगांवकर, रवी शिवराम मोरे, सचिन परदेशी, भास्कर वाकडीकर, मनीष व्हटकर, विकास म्हसकर, बाळाराम चिखलेकर आणि विशाल म्हसकर यांचे विशेष योगदान लाभले आहे.

# जनताच विधमान आमदारांना सक्तीच्या रजेवर पाठविणार : आडसकर

## टक्केवारीमुळे मतदारसंघातील विकास कामांची वाट लागली



माजलगाव । माजलगाव मतदारसंघांत आतापर्यंत रस्ते, पाणीपुरवठा योजना तसेच ईतर विकासाच्या योजनांकडे लोकप्रतनिधींकडून अक्षम्य दुर्लक्ष झाले. आमदारानेच गुत्तेदारांकडून टक्केवारी घेतल्याने सर्व कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला. मला संधी मिळाल्यास सर्व विकासकामे उभा राहून करणार असल्याचे रमेश आडसकरांनी स्पष्ट केले. अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांनी तालुक्यातील कल्याण नगर, सिद्धेश्वर नगर, मोठेवाडी, आबेगाव, बोरगाव, रोशनपुरी, नागडगाव येथे प्रचार बैठका तसेच कॉर्नर सभांना संबोधित केले या वेळी अनेक गावात रमेश आडसकरांचे ओवाळून, फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. गावकऱ्यांनी रमेश आडसकरा समोर अनेक प्रश्न मांडले या प्रसंगी बोलताना आडसकरांनी सांगितले कि, मतदारसंघातील जनतेसोबत आमदारांनी विश्वासघात केला आहे. मागील निवडणुकीत जनतेने प्रकाश सोळंकेना निवडून दिले परंतु त्यांनी जनतेच्य प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन केवळ स्वतः च्या तुंबड्या भरण्याचे काम केले. मतदारसघांतील सर्वच विकासकामात टक्केवारीची नवीन भाषा सुरु झाली. रस्ते,पाणीपुरवठा योजनां समवेत सर्वच विकास कामाच्या गुणवत्तेत प्रभाव पडला यामुळे रस्त्यांची चाळण झाली. आमदार प्रकाश सोळंकेना जनता माफ करणार नसून त्यांना सन्मानपूर्वक सक्तीच्या निवृत्तीवर पाठवणार आहे. मला जनतेने संधी दिल्यास मी रस्त्यावर उभा राहून गुत्तेदारांकडून काम करुन घेणार असल्याचे आडसकरांनी सांगितले. या प्रसंगी रमेश आडसकरां सोबत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, बाळासाहेब जाधव, बबन बप्पा सोळंके, युवा नेते तन्मय होके पाटील यांच्या सह सरपंच, उपसरपंच, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन, सदस्या सहित ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# पुढील ५ दिवस राज्यात मुसळधार पाऊस पंजाबराव डख यांचा अंदाज




महाराष्ट्रातील हवामान सध्या एका नवीन वळणावर येऊन ठेपले आहे. प्रसिद्ध हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी राज्याच्या हवामानाबद्दल केलेल्या ताज्या अंदाजानुसार, येत्या काळात राज्यातील शेतकरी वर्गाला विशेष दक्षता घ्यावी लागणार आहे. विशेषतः रब्बी हंगामाच्या दृष्टीने ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.सध्याची परिस्थिती सध्या महाराष्ट्रात पावसाची एकही नोंद झालेली नाही, जे राज्यातील कोरड्या हवामानाचे द्योतक आहे. मान्सूनच्या परतीच्या काळात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.थंडीचे आगमन आणि त्याचे परिणाम पंजाबराव डख यांच्या अंदाजानुसार, दिवाळीनंतर राज्यात कडाक्याची थंडी पडण्याची शक्यता आहे. सध्या राज्यातील काही भागांमध्ये थंडीचे प्रमाण कमी असले तरी, येत्या काळात ते वाढण्याची चिन्हे आहेत. विशेषतः पूर्व विदर्भ, पश्चिम विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या भागांमध्ये थंडीची तीव्रता जास्त असेल. या बदलत्या हवामानाचा थेट परिणाम शेती क्षेत्रावर होणार आहे. रब्बी हंगामासाठी महत्त्वपूर्ण सूचना पंजाबराव डख यांनी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीची कामे त्वरित पूर्ण करण्याचा सल्ला दिला आहे. सध्याचे हवामान रब्बी हंगामासाठी अनुकूल असल्याने, शेतकऱ्यांनी या संधीचा पूर्ण फायदा घ्यावा असे त्यांचे मत आहे. विशेषतः थंड हवामानाचा फायदा घेऊन पेरणीची कामे वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.पुढील काळातील हवामान अंदाज १३ आणि १४ नोव्हेंबर दरम्यान राज्यात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. मात्र या काळात पावसाची शक्यता नाही असे पंजाबराव डख यांनी स्पष्ट केले आहे. दक्षिण भारतातील तामिळनाडू आणि केरळमध्ये मात्र मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. महाराष्ट्रात मात्र पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी आपली शेतीची कामे सुरू ठेवावीत असा सल्ला त्यांनी दिला आहे.शेतकऱ्यांसाठी विशेष सूचना हवामान तज्ज्ञांच्या या अंदाजानुसार, शेतकऱ्यांनी पुढीलप्रमाणे तयारी करावी:रब्बी हंगामातील पिकांची पेरणी वेळेत पूर्ण करावी थंड हवामानाचा विचार करून पिकांचे नियोजन करावे पाण्याचे योग्य नियोजन करावे हवामान बदलानुसार पीक संरक्षणाची काळजी घ्यावी शेतीची कामे वेळापत्रकानुसार पूर्ण करावी सरकारी योजनांची मदत या काळात शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेसारख्या शासकीय योजनांचाही लाभ मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीची घोषणा केली असून, याचा फायदा शेतकऱ्यांना त्यांच्या शेती कामांसाठी होणार आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com